# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. पंडीत एन्. शेळके
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/१०४६/२०१४

दि. ९ जाने.२०१४

प्रति,
मा. प्राचार्य /कार्यक्रम अधिकारी
सर्व रासेयो संलग्नित महाविद्यालये
पुणे व पिंपरी चिंचवड विभाग

विषय : 'रस्ता सुरक्षा अभियान' पुरस्कार वितरणाकरीता उपस्थित राहणेबाबत...

महोदय,

अप्पर पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठ व संस्थांमध्ये नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने जनजागृती करण्याच्या उद्‌देशाने दि १ ऑगस्ट २०१३ ते ३१ डिसेंबर २०१३ या कालावधीमध्ये महाविद्यालयांमध्ये **'रस्ता सुरक्षा अभियान'** अंतर्गत विविध उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार महाविद्यालयांनी राबविलेल्या उपक्रमांच्या आधारावर विद्यापीठास पाठविलेले प्रस्तावानुसार महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावतीने प्रथम, द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ याप्रमाणे उत्कृष्ठ महाविद्यालयांची पुरस्काराकरीता निवड करण्यात आली आहे.

सदर पुरस्कार वितरण समारंभ **दि. १३ जानेवारी २०१४ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० यावेळेत आयुका सभागृह, पुणे विद्यापीठ** याठिकाणी आयोजित करण्यात आला असून मा. राज्यसंपर्क अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, रासेयो कक्ष, मुंबई यांनी कळविल्यानुसार या पुरस्कार वितरण कार्यक्रमाकरीता आपण आपल्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी व १० रासेयो स्वयंसेवक यांना दि. १३ जानेवारी २०१४ रोजी दुपारी २.३० वाजता उपस्थित राहण्याविषयी कळवावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू
9/1/14
प्र.कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना